फोन नं. ०२२-६९९६२३००
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.org.in

महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई**

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.

क्र. ३/विकामुं/तंशि/लेखा-५/२०२४/ 808 दिनांक 23 FEB 2024

**कालमर्यादीत** **परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य
सर्व शासकीय तंत्रनिकेतने
व तत्सम संस्था

विषय : आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी खरेदी करावयाच्या यंत्रसामग्री/उपकरणे खरेदीचा प्रस्ताव सादर करणेबाबत
संदर्भ : तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. ११/तंशिसं/प्रस्ताव/२०२४-२५/९४४, दि.२१/०२/२०२४

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुसार सर्व शासकीय पदविका संस्थांना कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयाचे संदर्भीय पत्र सोबत जोडले आहे. त्याचे अवलोकन करावे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्य शासनाकडून प्राप्त अनुदानातून खरेदी करावयाच्या यंत्रसामग्री/उपकरणांची संस्थानिहाय अंतिम यादी संदर्भीय पत्रासोबतच्या "प्रपत्र अ" मध्ये **दि. २६/०२/२०२४ पर्यंत** मागविण्यात येत आहे. यासाठी संस्थांनी संदर्भीय पत्रातील क्र. १ ते ९ सूचनांचे काटेकोर पालन करुन संस्थेतील शाखानिहाय प्रस्ताव "प्रपत्र अ" अन्वये संदर्भीय पत्रातील सूचना क्र.८ व ९ नुसार सादर करावयाचा आहे.

सदर प्रस्ताव संस्थेतील जबाबदार अधिकाऱ्यामार्फत तपासणीसाठी सादर करावा. संदर्भीय पत्रातील सूचनांचे पालन न केलेल्या व अपूर्ण माहिती असलेल्या याद्या स्विकारण्यात येणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

सहपत्रे : वरीलप्रमाणे

**(प्रमोद अं. नाईक)**
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत :
मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४११/४७०/४३१
ई-मेल–desk11@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

कालमर्यादित

क्रमांक :- ११/तंशिसं/प्रस्ताव/२०२४-२५/ ९४४
दिनांक २९/०२/२०२४.

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई/नागपूर/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती

**विषय :- आर्थिकवर्ष २०२४-२५साठी खरेदी करावयाच्या यंत्रसामग्री / उपकरणे खरेदीचा प्रस्ताव सादर करणेबाबत.**

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्य शासनाकडून प्राप्त अनुदानातून खरेदी करावयाच्या यंत्रसामग्री/ उपकरणांची संस्थांनिहाय अंतिम यादी सोबतच्या प्रपत्रांमध्ये दि.२९/०२/२०२४ पर्यंत मागविण्यात येत आहे. यासाठी विभागीय कार्यालयाने खालील सूचना आपल्या अधिनस्त शासकीय तंत्रशिक्षण संस्थाचे (स्वायत्त वगळून) निदर्शनास आणून त्यांचेकडून शाखानिहाय यादया प्राप्त करुन घ्याव्यात व प्रत्येक विभागातील सर्व संस्थांची एकत्रित शाखानिहाय यादी या संचालनालयास सादर करावी.(उदा.अमरावती विभाग सर्व संस्था यंत्र अभियांत्रिकी शाखेची एक यादी, स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची एक यादी याप्रमाणे)

1. आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी आवश्यक यंत्रसामग्री/ संगणक व इतर सुविधा (झेरॉक्स मशिन, वॉटर कुलर, फर्निचर ) याबाबत माहिती / यादी तयार करण्याच्या सूचना संबंधितांना दयाव्यात. यादी तयार करुन विभागीय कार्यालयास शाखानिहाय सादर करण्यासाठी अंतिम दिनांक २९/०२/२०२४ असेल. तसेच यादी तयार करताना ज्या शाखेसाठी आजपर्यंत काहीच खरेदी झालेली नाही किंवा अत्यल्प झालेली आहे अशा साहित्यास प्राधान्य द्यावे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ व राज्य सीईटी कक्ष यांचेकडून लवकरच काही सुविधा / साहित्य उपलब्ध होणार आहे. त्याबाबत माहिती घेऊन अशा साहित्याचा समावेश मागणी यादीत होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. तसेच जिल्हा नियोजन समितीकडे काही मागणी केलेली असेल तर असे साहित्य देखील वगळण्यात यावे. राज्य व केंद्र

निधीतून २०२३-२४ मधील साहित्य खरेदीचे आदेश यापूर्वीच ई-मेलद्वारे पाठविले आहेत असे साहित्य देखील २०२४-२५ च्या प्रस्तावित यादीतून वगळण्यात यावे.

2. यंत्रसामग्री/उपकरणांचा प्रस्ताव तयार करताना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांनी निदर्शनास आणलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याचे दृष्टीने साहित्याचा समावेश प्राधान्यक्रमाने करावा. त्यानंतर संस्थेस एनबीए नामांकन मिळण्याचे दृष्टीने आवश्यक तयारीचा भाग म्हणून पाहिजे असणाऱ्या साहित्याचा समावेश करावा.
3. प्रस्तावित यंत्रसामग्री/उपकरणे संस्थेत चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांशी सुसंगत व विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांसाठी आवश्यक आहेत याची खात्री करण्यात यावी व तसे प्रमाणित करण्यात यावे.
4. साहित्याचे दर GeM संकेतस्थळ व इतर प्रचलित ऑनलाईन व्यापारी संकेतस्थळावरुन किंवा मूळ उत्पादक/त्यांचे अधिकृत विक्रेते यांनी दिलेल्या दरपत्रकांचे आधारे निश्चित करावेत.याबाबत संस्था प्रमुखांनी व्यक्तिश: खातरजमा करावी.
5. प्रस्तावित यंत्रसामग्री /उपकरणे यांचे स्पेसिफिकेशन्स हे Generic स्वरुपाचे आहे याची खातरजमा करण्यात यावी. ठराविक उत्पादकाच्या उत्पादनाची मागणी सादर होणार नाही याबाबत दक्ष असावे.प्रोप्रायटरी उत्पादनांच्या बाबतीत त्या प्रकारचे उत्पादन इतर उत्पादकाकडून तयार करण्यात येत नाही याची खात्री करण्यात यावी व तसे प्रस्तावित करावे.
6. दरांची अंदाजित किंमत ठरविण्याची पद्धत – प्रस्तावित यंत्रसामग्री/ उपकरणांच्या अंदाजित किंमती सादर करणे अत्यावश्यक आहे. किमतींचा अंदाज घेताना शासन निर्णय क्र. भाखस-2014/प्र.क्र.82/ भाग-III/उद्योग-4 दि.१ डिसेंबर २०१६ मधील कलम ३.१.२.२ मधील निर्देशांचे पालन करण्यात यावे. अंदाजित किंमत निर्धारीत करताना उत्पादनांचे सर्वसाधारण मुल्य, त्यावर लावले जाणारे कर/उपकर, वाहतूक खर्च, डेमॉनस्ट्रेशन, प्रिडिस्पॅच इन्स्पेक्शन, ट्रेनिंग (आवश्यक असल्यास, फाऊंडेशन, वायरिंग) इ. खर्चाचा अंतर्भाव असावा. ज्या उपकरणाची, यंत्रसामग्रीची प्रति नग किंमत रु.३.०० लाखापेक्षा कमी आहे त्या उपकरणाचा वॉरंटी कालावधी २ वर्षे इतका विहित करण्यात यावा. ज्या उपकरणाची, यंत्रसामग्रीची किंमत रु.३.०० लाखापेक्षा जास्त व रु.७.०० लाखापेक्षा कमी आहे अशा उपकरणांची, यंत्रसामग्रीचा वॉरंटी कालावधी ३ वर्षे इतका विहित करण्यात यावा, तसेच ज्या उपकरणाची, यंत्रसामग्रीची किंमत रु.७.०० लाखापेक्षा जास्त आहे अशी उपकरणे, यंत्रसामग्रीकरीता ५ वर्षे इतका वॉरंटी कालावधी विहित करण्यात यावा.मात्र संगणकासाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग यांच्या सूचनेनुसार ५ वर्षाची वॉरंटी विहित करण्यात यावी. याप्रमाणे वॉरंटी कालावधीची गणना करूनच साहित्याची अंदाजित किंमत ठरविण्यात यावी. आयात करण्यात येणाऱ्या वस्तूंच्या अंदाजित किमतीसंदर्भात परकीय चलनाचा विनिमय दर आणि सीमा शुल्क इ. विचारात घ्यावेत. सदरच्या किंमती या बाजारपेठेचे सर्वेक्षण, यापूर्वीची खरेदी किमत, संभाव्य विक्रेत्यांकडून घेण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील किमत इ.चा अभ्यास करून करुन प्रस्तावित करणे आवश्यक आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार अंदाजित किमतीच्या +१०% पेक्षा जास्त व - २०% पेक्षा कमी किमतीचे खरेदी प्रस्ताव मंजूर करता येत नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.
7. यापूर्वी सादर केलेल्या मागणी यादीतील जी साधनसामुग्री खरेदी झाली नाही अशा साहित्याचा समावेश प्रस्तावित नवीन यादीत करण्यास हरकत नाही. मात्र अशा साहित्याचे दर व विनिर्देश अद्ययावत असावेत.

8. संस्थांनी प्राधान्यक्रमानुसार उपकरणाच्या खरेदीची यादी सादर करताना यादी क्र.१ अंदाजित किंमत रु.५०.०० लक्षपर्यंत (सर्व साहित्याची एकूण अंदाजित रक्कम - योग्य त्या वॉरंटी सह आणि सर्व कर समाविष्ट ) व यादी क्र. २ अंदाजित किंमत रु.५०.०० लक्षपर्यंत (सर्व साहित्याची एकूण अंदाजित रक्कम - योग्य त्या वॉरंटी सह आणि सर्व कर समाविष्ट ) सादर कराव्यात. या दोन्ही यादया प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविण्यात याव्या. उदा. प्रपत्र 'अ' (Format 'A') मधील अनुक्रमांक १ ते २५ यांची अंदाजित किंमतरु.५०.०० लक्षपर्यंत असेल तर यादीतील अनुक्रमांक १ च्या वर यादी क्र.१ असे शिर्षक दयावे आणि अनुक्रमांक २५ नंतरच्या रु.५०.०० लक्षपर्यंतच्या मर्यादेतील यादीस यादी क्र.२ असे शिर्षक दयावे. मात्र वरील सर्व यादी प्रपत्र 'अ' (Format 'A') मध्येच एकत्र देण्यात याव्यात.
9. यंत्रसामग्री/उपकरणांची यादी संबंधित विभागप्रमुख/ LAB INCHARGE व प्राचार्यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. संबंधितांच्या सहीच्या पत्राची SCANNED COPY व MS EXCEL मधील SOFT COPY विभागीय कार्यालयास ई-मेलद्वारे पाठविण्यात यावी. विना सहीच्या, अपूर्ण माहिती असलेल्या, याद्या स्वीकारण्यात येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.
10. विभागीय स्तरावर संस्थांकडून प्राप्त होणारी यंत्रसामग्री/उपकरणांची यादी तपासण्याकरीता प्राचार्य/ विभाग प्रमुख स्तरावरील एका तज्ज्ञाची 'समन्वयक' म्हणून नेमणूक करण्यात यावी.

**वरील अनुक्रमांक १ ते १० वरील सुचनांचे अनुषंगाने यादया तयार केल्या असून संस्थेची आवश्यकता, दरांची रास्तता व तांत्रिक विनिर्देश सर्वसाधारण व परिपूर्ण असल्याची खातरजमा करुन तसे सहसंचालकांनी प्रमाणित करावे व ही यादी समन्वयकामार्फत हस्तदेय या कार्यालयास विहित कालावधीत सादर करावी.**

( डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत: प्राचार्य, सर्व शासकीय तंत्र निकेतने आणि तत्सम संस्था यांना कळविण्यांत येते की, सदर परिपत्रकातील सूचनांनुसार आपल्या संस्थेतील यंत्रसामग्री/साधनसामग्रीचा शाखानिहाय प्रस्ताव दि. २६ /०२/२०२४ पर्यंत आपल्या विभागीय कार्यालयास निश्चितपणे पाठवावा..

**Regional Office :**

**Branch Name :**

| Sr. No. | Name of Institute | Equipment Name | Brief Specifications | Qty. to be purchased | Unit Cost (Rs.) | Total Cost (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4 | | | | | | |
| 5 | | | | | | |
| 6 | | | | | | |
| 7 | | | | | | |
| | | | Grand Total (Rs.) | | | |

Certified that the proposed list of equipment/ machinary to be purchased for _________ branch in Govt. institutes under_______________ region has been thoroughly verified and found curriculum relevence,

Name and Signature of the Joint Director

# DIRECTORATE OF TECHNICAL EDUCATION, M.S. MUMBAI

**Name and Address of Institute :-**

FORMAT A

**LIST OF LABORATORY EQUIPMENT/ MACHINARY/FURNITURE**

## GRANT HEAD -

STATE GRANT

**PREPARE SEPERATE LIST FOR EACH BRNCH**

| pruority no | Name of the Equipment to be procured (consolidated for entire institute ) | Required Quantity as per AICTE/MSBTE/University Norms | Quantity Available with Institute | No of units purchased in last 5 years | Balance quantity to be purchased. | Reason for Purchase( New Purchase/ Replacement of written off equipment/ New Purchase due to change in curriculum/ other reason) | Approx Esimated Unit Cost of Equipment (In Rs.) | Total Approx Cost of Equipment (In Rs.) | REMARK |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | | |
| 7 | | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | | |
| | | | | | | | Total Rs. | | |

Certified that the proposed list of equipment/ machinary to be purchased has been thoroughly varified for curriculam relevence, Unit cost, proper planning for full utilisation of machinery and availability of funds.

Name and Signature of the Principal

# DIRECTORATE OF TECHNICAL EDUCATION, M.S. MUMBAI

**Name and Address of Institute :-**

**FORMAT A**

**LIST OF LABORATORY EQUIPMENT/ MACHINARY/FURNITURE**

## GRANT HEAD -

**DCA GRANT**

**PREPARE SEPERATE LIST FOR EACH BRNCH**

| pruority no | Name of the Equipment to be procured (consolidated for entire institute ) | Required Quantity as per AICTE/MSBTE/University Norms | Quantity Available with Institute | No of units purchased in last 5 years | Balance quantity to be purchased. | Reason for Purchase( New Purchase/ Replacement of written off equipment/ New Purchase due to change in curriculum/ other reason) | Approx Esimated Unit Cost of Equipment (in Rs.) | Total Approx Cost of Equipment (in Rs.) | REMARK |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** |
| 1 | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | | |
| 7 | | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | | |
| | | | | | | | Total Rs. | | |

Certified that the proposed list of equipment/ machinary to be purchased has been thoroughly verified for curriculam relevence, Unit cost, proper planning for full utilisation of machinery and availability of funds.

Name and Signature of the Principal